SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

मंगळवार, दिनांक ८ सप्टेंबर, २०२६

अधिसूचना

क्रमांक : १४१/२०२६. दिनांक : ०८/०९/२०२६.

विषय :- आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखेअंतर्गत **CGS** व **CBCS** पदवी अभ्यासक्रमांच्या सत्र १ ते सत्र ४ ला दिलेल्या संधी संपुष्टात आणण्याबाबत तसेच अधिसूचना क्रमांक ५५/२०२४, दिनांक २९.०५.२०२४ मधील दुरुस्तीबाबत शुध्दीपत्रक.

संदर्भ :- १) अधिसूचना क्रमांक ५३/२०२४, दिनांक २९.०५.२०२४
२) अधिसूचना क्रमांक ५५/२०२४, दिनांक २९.०५.२०२४
३) अधिसूचना क्रमांक ३५ ते ४०/२०२४, दिनांक ०६.०४.२०२४
४) अधिसूचना क्रमांक ११/२०२६ दिनांक १७.०१.२०२६,
५) अधिसूचना क्रमांक ९२/२०२६ दिनांक १७.०७.२०२६,
६) अधिसूचना क्रमांक १०६/२०२६ दिनांक १०.०८.२०२६.

सर्व संबंधितांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून शासनाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे पदवी (U.G.) अभ्यासक्रमांना NEP-2020 चा अभ्यासक्रम लागू करण्यात आला असल्यामुळे पदवी (U.G.) सी.जी.एस. व सी.बी.सी.एस. च्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उपरोक्त संदर्भीय क्रमांक १ ते ५ च्या अधिसूचनेप्रमाणे संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

परंतु, शैक्षणिक सत्र २०२२-२०२३ पासून टप्प्याटप्याने सदर अभ्यासक्रम सी.बी.सी.एस. अन्वये कार्यान्वित झाल्यामुळे व त्याबाबतच्या सी.जी.एस. सत्र १ ते ४ व सी.बी.सी.एस. सत्र १ ते ४ च्या समकक्ष अभ्यासक्रमाच्या सत्रनिहाय समकक्षतेच्या अधिसूचना वेळोवेळी निर्गमित करण्यात आल्यामुळे ज्या सी.जी.एस. च्या वरील अभ्यासक्रमांना संदर्भीय क्रमांक १ ते ४ च्या अधिसूचनेप्रमाणे संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या, त्या अभ्यासक्रमांच्या, उपरोक्त संदर्भीय अधिसूचनेतील सत्र १ ते ४ च्या संधी या अधिसूचनेव्दारे रद्द करण्यात येत असून फक्त सी.जी.एस./ सी.बी.सी.एस अभ्यासक्रमांच्या सत्र ५ आणि ६ लाच उपरोक्त संदर्भिय अधिसूचना क्रं.१ ते ०४ च्या संधी लागू राहतील.

तसेच संदर्भिय क्रं. १ च्या अधिसुचनेमधील B.S.W. / B.A. (Social work) / M.S.W. या अभ्यासक्रमांना NEP-2020 च्या शिफारसी लागू नसल्यामुळे, रकाना क्रं.३ च्या अनुषंगाने या अभ्यासक्रमांला NEP-2020 ऐवजी C.B.C.S. असे वाचावे तसेच रकाना क्रं. ४ मध्ये फक्त वरील अभ्यासक्रमांसाठी C.B.C.S. ऐवजी C.G.S. असे वाचावे.सदर अधिसुचनेतील C.G.S. पदवी अभ्यासक्रमांच्या Sem. V व VI च्या संधी कायम राहतील.

स्वा/-
(डॉ. अविनाश असनारे)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.